# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना कमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम कमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(महाविद्यालयीन विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली — ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२—२१६५९४ E-Mail : arcollegesectiongug48@gmail.com


गों.वि./म.वि /३२२ /२०१७ दिनांक: २ /११/२०१७

## परीपत्रक

प्रति,

मा. प्राचार्य,
गोंडवाना विद्यापीठाशी
संलग्नित सर्व महाविद्यालये,
(जिल्हा —चंद्रपुर व गडचिरोली )

विषय :— उच्च शिक्षण संचालनालय अखत्यारीत्या शिष्यवृत्ती/ आर्थिक सहाय्य योजनेची राज्यशासनाच्या **Maha DBT Portal** व्दारे अंमलबजावणी करणेबाबत.

संदर्भ :—१ .क्र.उशिनाग/शिष्यवृत्ती/६१५९/१७ दिनांक ०६/१०/२०१७
२. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण पुणे यांचे पत्र कमांक उशिसं/शिष्यवृत्ती—२०१७/डीबीटी पोर्टर्ल/११३३९ दिनांक २५/०५/२०१७

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयांन्वये आपणांस कळविण्यात येते कि, उच्च शिक्षण संचालनालयांच्या अखत्यारीतील शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनांची राज्यशासनाच्या **Maha DBT Portal** व्दारे अंमलबजावणी करणेबाबत पत्र विद्यापीठाला प्राप्त झालेले असुन सोबत संलग्नित केलेल्या पत्रानुसार महाविद्यालयाने कार्यवाही घ्यावी व केलेल्या कार्यवाही बाबतचा अहवाल मा. सहसंचालक, नागपुर विभाग, नागपुर यांना पाठवावा व तसेच त्याची प्रत विद्यापीठाला सादर करावी. ही विनंती

धन्यवाद!

आपला विश्वासु

सहपत्र:—संलग्नित उपरोक्तप्रमाणे.

(डॉ. व्ही.सी. सिल्हारे)
प्र.उपकुलसचिव(म.वि)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलीपी :— १) मा. शिक्षण संचालक ,उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे—१ यांचे सविनय सादर
२) मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण नागपुर विभाग नागपुर यांना सविनय सादर

महाराष्ट्र शासन
सहसंचालक उच्च शिक्षण नागपूर विभाग, नागपूर, जुने मॉरीस कॉलेज इमारत,
सिताबर्डी,नागपूर
(दुरध्वनी क्रमांक २५५४२१०/फॅक्स क्रमांक ०७१२-२५६१७१३)
Email:jdhengp@rediffmail.com

अतितात्काळ

कार्यालय, उच्च शिक्षण सहसंचालक,
नागपूर विभाग, नागपूर - ४४० ००१

क्र.उशिनाग/शिष्यवृत्ती/ ६१५९ /१७
दिनांक – ०६/१०/२०१७

प्रति १ कुलसचिव, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर
२ कुलसचिव, कवि कुलगुरू कालीदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक
३ कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४ सर्व प्राचार्य/संचालक.शास./अशासकीय महाविद्यालये/संस्था नागपूर विभाग, नागपूर

विषय - उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनांची राज्यशासनाच्या MahaDBT Portal द्वारे अंमलबजावणी करणेबाबत.

संदर्भ - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्रमांक उशिसं/शिष्यवृत्ती-२०१७/डीबीटी पोर्टल/११३३९, दिनांक २५/९/२०१७

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे पत्राचे अवलोकन करुन त्यानुसार सदर सूचना व कार्यसूचीत परिशिष्ट- अ मध्ये नमूद असलेल्या उच्च शिक्षण संचालनालय व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेमार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्यशासनाच्या शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनांची **MahaDBT Portal** द्वारे ऑनलाईन अंमलबजावणी करण्यात येत आहे.

सदरच्या सूचना सर्व विद्यापीठ यांनी आपल्या अधिनस्थ असलेल्या संस्था/महाविद्यालयांना तात्काळ निर्गमित कराव्यात.

A.M.Rahangdale
सहसंचालक उच्चशिक्षण,
नागपूर विभाग, नागपूर

प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे माहितीस्तव सादर.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
आवक क्र. 5370 दि. 26/10/17
आवक क्र. 2899 दि. 26/10/17

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
web: www.dhepune.gov.in E-mail: scholarshiphd2@gmail.com
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं/शिष्य-२०१७/डीबीटी पोर्टल/ 19332 दि. 25 SEP 2017

**परिपत्रक**

जावक क्र. 2628
कार्यालय उच्च शिक्षण सहसंचालक
नागपूर विभाग, नागपूर - ४४० ००१
दिनांक 4.10.16

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

२. कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे.

विषय - उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शिष्यवृत्ती / आर्थिक सहाय्य योजनांची राज्यशासनाच्या MahaDBT Portal द्वारे अंमलबजावणी करणेबाबत..

संदर्भ- शासन निर्णय क्र. स्कॉलर-४९७१/प्र.क्र.१४६/मशि-२, दि. ०२/०८/२०१७.

सन २०१७-१८ पासून संदर्भित शासन निर्णयातील परिशिष्ट -अ मध्ये नमूद असलेल्या उच्च शिक्षण संचालनालय व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेमार्फत राबविण्यात येणा-या राज्यशासनाच्या शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनांची महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन अंमलबजावणी करण्यात येत आहे.

संदर्भिय शासन निर्णयात नमूद परिशिष्ट-अ मधील योजना खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | योजनांची नांवे |
|---|---|
| १. | राज्यशासनाची खुली गुणवत्ता |
| २. | गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती |
| ३. | शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती. |

**राज्यशासनाची खुली गुणवत्ता-नवीन मंजूरी अटी-**

या योजनेसाठी राज्याकरिता एकुण १२०८ संच मंजूर आहेत. पैकी २३० संच वाणिज्य शाखेकरिता व ५५ संच विधी शाखेसाठी मंजूर असून उर्वरित ९२३ पैकी २/३ संच विज्ञान शाखेसाठी व १/३ संच कला शाखेसाठी मंजूर आहेत. शिष्यवृत्तीच्या नवीन मंजूरीसाठी पुढील अटी लागू आहेत.

१. विद्यार्थ्यास फेब्रुवारी/मार्च २०१७ मध्ये राज्यशिक्षण मंडळाकडून घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत किमान ६० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण असणे आवश्यक आहे.

२. विद्यार्थ्याने कला, विज्ञान , वाणिज्य व विधी विद्याशाखेच्या पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असणे आवश्यक आहे.

३. विद्यार्थ्यांच्या खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती नवीन मंजूरी तथा नुतनीकरणाचे ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्यासाठी राज्यशासनामार्फत MahaDBT Portal पोर्टल सुरु करण्यात आलेले आहे. सदर शिष्यवृत्ती/सवलती योजनांचे नवीन मंजूरी/नुतनीकरणाचे अर्ज हे विद्यार्थ्यांनी www.mahadbt.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने भरणे आवश्यक आहे.

-२-

शिष्यवृत्ती विभाग
श्री जाधव
04.10.17

३. शासकीय
राज्यातील शास
१. माध्यमिक शाळां
प्रत्येकी



राज्यशासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती-नुतनीकरण अटी-

१. ज्या विदयार्थ्यांस मागील वर्षात म्हणजेच सन २०१६-१७ मध्ये खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती (नवीन मंजुरीची किंवा नूतनीकरणासाठीची ) मंजुर आहे, असे विदयार्थी या वर्षासाठी नुतनीकरणाचा अर्ज भरण्यासाठी पात्र आहेत.
२. नूतनीकरणासाठी लाभार्थी विदयार्थ्यास मागील वर्षाच्या परीक्षेत किमान ६० टक्के गुण असणे आवश्यक आहे.
३. नुतनीकरणाच्या प्रस्तावासोबत विदयार्थ्यांचा संबंधित प्राचार्यांने जोडलेला प्रगती अहवाल असणे आवश्यक आहे.
४. नूतनीकरणाचे ऑनलाइन पध्दतीने अर्ज भरण्यासाठी मागील वर्षाचा मंजुरी आदेश क्रमांक असणे आवश्यक आहे. त्यामुळे महाविदयालयाकडून विदयार्थ्यांना मंजुरी आदेश देण्यांत यावा.
५. विदयार्थ्यांनी उपरोक्त शिष्यवृत्ती/सवलतींचे ऑफलाईन पध्दतीने अर्ज करु नयेत. तथापि, यापूर्वी सन २०१७-१८ साठी ज्या महाविदयालयांनी/विदयापीठांनी विदयार्थ्यांचे ऑफलाईन अर्ज उच्च शिक्षण अथवा विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेकडे सादर केलेले असतील त्या विदयार्थ्यांनी ऑनलाइन पध्दतीने भरणे आवश्यक आहे. यासाठी महाविदयालय/विदयापीठांकडून संबंधित विदयार्थ्यांना सूचना देऊन ऑनलाईन अर्ज भरणेबाबत कळविण्यांत यावे. विदयार्थ्यांने ऑनलाइन अर्ज न भरल्यामुळे विदयार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविदयालयाची राहील.

## २. गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विदयार्थ्यांना देण्यांत येणारी शिष्यवृत्ती

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०१७ मध्ये गणित व भौतिकशास्त्र विषयामध्ये विशेष प्रावीण्य मिळविणा-या विदयार्थ्यांना देण्यांत येणारी शिष्यवृत्ती मंजुरी योजना या योजनेचे नवीन मंजुरी तथा नूतनीकरणाचे ऑनलाइन पध्दतीने अर्ज भरण्यासाठी राज्यशासनामार्फत MahaDBT Portal पोर्टल सुरु करण्यांत आलेले आहे. सदर शिष्यवृत्ती/सवलती योजनांचे नवीन मंजुरी/नुतनीकरणाचे अर्ज हे विदयार्थ्यांनी www.mahadbt.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाइन पध्दतीने भरणे आवश्यक आहे. या योजनेसाठी गणित विषयाकरिता ५० व भौतिकशास्त्र या विषयाकरिता ५० संच मंजूर आहेत. <u>शिष्यवृत्तीच्या नवीन मंजुरीसाठी पुढील अटी लागु आहेत.</u>

१. इ.१२ वी विज्ञान या परीक्षेत किमान ६० टक्के व गणित, भौतिकशास्त्र या विषयात ६० टक्क्यापेक्षा अधिक गुण प्राप्त करणा-या व संबंधित विदयापीठांनी शिफारस केलेल्या विदयार्थ्यांना सदर शिष्यवृत्ती मंजूर केली जाते

२. प्रथमवर्ष पदवीसाठी गणित व भौतिकशास्त्र विषय घेतलेल्या विदयार्थ्यांची माहिती विषयनिहाय (गणित/भौतिकशास्त्र) स्वतंत्र देण्यांत यावी.

| ३. | शासकीय विदयानिकेतन शिष्यवृत्ती. |
|---|---|

१. राज्यातील शासकीय विदयानिकेतन पुसेगांव, अमरावती, औरंगाबाद व धुळे या चार विदयानिकेतनांकरिता माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (१० वी) मध्ये ६० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त करणा-या विदयार्थ्यांसाठी प्रत्येकी २० प्रमाणे ८० संच कायमस्वरुपी मंजूर आहेत.

२. विदयार्थ्यांच्या शासकीय विदयानिकेतन शिष्यवृत्ती नवीन मंजुरी तथा नूतनीकरणाचे ऑनलाइन पध्दतीने अर्ज भरण्यासाठी राज्यशासनामार्फत MahaDBT Portal पोर्टल सुरु करण्यांत आलेले आहे. सदर शिष्यवृत्ती/सवलती योजनांचे नवीन मंजुरी/नुतनीकरणाचे अर्ज हे विदयार्थ्यांनी www.mahadbt.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने भरणे आवश्यक आहे.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्रराज्य, पुणे-१.

प्रत,

माहिती व पुढील कार्यवाहीस्तव.

१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-०१.
२. संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, भोसलेनगर, भांबुर्डा, पुणे-०५.
३. संचालक, वैदयकीय शिक्षण संचालनालय, मुंबई-०१.
४. संचालक, आयुर्वेद व युनानी संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
५. संचालक, आरोग्य संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
६. संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१.